# University of Mumbai

Website – mu.ac.in
Email id - dr.aams@fort.mu.ac.in
aams1@mu.ac.in

**Academic Authorities,
Meetings &Services (AAMS)
Room No. 130, M. G. Road, Fort,
Mumbai – 400 032.
Tel. 022-68320033**

**Re- accredited with A ++ Grade (CGPA 3.65) by NAAC
Category- I University Status awarded by UGC**

No. A.A.M.S./ICC/2024-25/14

## CIRCULAR:

Attention of the Principals of all Affiliated and Autonomous Colleges of University of Mumbai is invited to Government Circular No. Sankirna – 2024/ Pr.K. 01/ Vishi-3, dated 20 December, 2024 regarding the implementation of School Connect 2.0. (Copy of the same is attached herewith)

As per the guidelines of the Government Circular, University shall provide a list of resource persons to be invited for School Connect 2.0. There will be a common presentation for School Connect 2.0 consisting of all the salient features of NEP 2020 and all the flagship schemes launched by Central and State Governments for empowerment of students in the higher education arena.

Responsibility of organising College Principal :

1. Refer to शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण -२०२४/प्र.क्र. ०१/विशि-३ दिनांक २० डिसेंबर २०२४
2. Identify Junior Colleges/ schools connected to your management.
3. Additionally Identify other Junior Colleges/ Schools in your vicinity.
4. Decide the date in consultation with District Coordinators, School Principal /Head Master of the concerned school where School 2.0 Connect will be conducted.
5. Identify resource person from the list provided by University with the help of district Coordinators.
6. Refer to the implementation plan of the School Connect 2.0 session as given in शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण -२०२४/प्र.क्र. ०१/विशि-३ दिनांक २०डिसेंबर २०२४.
7. Conduct the session at the identified Junior college/ school.
8. Take attendance of students attending the session.
9. Take geo tagged photographs.
10. Write report in the format given below
11. Upload the report on the link https://forms.gle/cUH72sTxYhYacA937
12. Submit the repost online to the District coordinator.

Responsibility of District Coordinators :

1. To provide all support to the principals of colleges/ schools in the districts for organizing School Connect 2.0

Website – mu.ac.in
Email id - dr.aams@fort.mu.ac.in
aams1@mu.ac.in

**Academic Authorities,**
**Meetings &Services (AAMS)**
**Room No. 130, M. G. Road, Fort,**
**Mumbai – 400 032.**
**Tel. 022-68320033**

**Re- accredited with A ++ Grade (CGPA 3.65) by NAAC**
**Category- I University Status awarded by UGC**

---



2. To ensure timely and complete submission of the report of the activity conducted
3. To collate the reports of all the colleges in provided format.

You are requested to send the report as per the attached format on the link given below :-

https://forms.gle/cUH72sTxYhYacA937

(Dr. Prasad Karande)
Registrar,
University of Mumbai

Mumbai – 400 032.
Date : 02/01/2025

**To,**

The Principals of all Affiliated and Autonomous Colleges under University of Mumbai.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च शिक्षण संचालनालय,.महाराष्ट्र राज्य,**
**412 ई, बहिरट पाटील चौक, मॉडेल कॉलनी, शिवाजीनगर पुणे-411 016**
Web : www.dhepune.gov.in E-mail:vishi.dhepune@nic.in
फोन नं.020/26122119

क्रमांक-युएनआय/(136/22)/विशि-1/भाग-3 दि.

प्रति,

1.मा.कुलगुरू, प्र-कुलगुरू व कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य
2.सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.

**विषय राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगान विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलाबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठ स्तरावरून स्कुलकनेक्ट 2.0 हेसंपर्क अभियान राबविण्याबाबत.**

संदर्भ शासन परिपत्रक क्रमांक संकिर्ण-2024/प्र.क्र.01/विशि-3 दि.20 डिसेंबर, 2024

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भिय शासन परिपत्रकाची प्रत सोबत जोडली आहे, कृपया अवलोकनी घ्यावी.

वरील संदर्भिय परिपत्रकानुसार कळविण्यात येतेकी, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगानेविद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलाबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषी विद्यापीठ स्तरावरून स्कुलकनेक्ट 2.0 हेसंपर्क अभियान राबविण्याबाबतचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अनुषंगाने उचित कार्यवाही सर्व अकृषि विद्यापीठे व सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावी.

या सर्व अभियानाचे समन्वय संबंधित विभागातील सहसंचालक उच्च शिक्षण हे करतील विद्यापीठांनी राबविलेल्या उपक्रमांचा अहवाल सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी संचालनालयास दि.10 फेब्रुवारी, 2025 पर्यंत सादर करावा.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 27-12-2024 16:07:23

**(डॉ.शैलेंद्र देवळाणकर)**
प्र.शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-16.

**प्रत- माहितीस्तव सादर**
मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-32

**राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यार्थी उपयोगी शैक्षणिक बदलांबाबत विद्यार्थ्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने सर्व अकृषि विद्यापीठस्तरावरुन स्कुल कनेक्ट २.० हे संपर्क अभियान राबविण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकिर्ण- २०२४/ प्र.क्र.०१/ विशि-३**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
४ था मजला, मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २० डिसेंबर, २०२४

**वाचा**- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्रमांक, संकिर्ण- २०२४/ प्र.क्र.०१/ विशि-३ दिनांक ५ जानेवारी, २०२४

**परिपत्रक-**

राज्यात राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० ची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून करण्यात येत आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेचे संपूर्ण नूतनीकरण आणि आमूलाग्र व्यापक बदल होत असतांना, त्याविषयीची जनजागृती आणि सातत्यपूर्ण समुपदेशनाची नितांत गरज लक्षात घेऊन शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये कनिष्ठ महाविद्यालयांतून इयत्ता १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांमध्ये त्याबाबतच्या सकारात्मक बाबी पोहोचविण्यासाठी संदर्भाधीन दि.०५.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये सर्व अकृषि विद्यापीठस्तरावर **स्कुल कनेक्ट अभियान** राबविण्यात आले आहे.

२. उच्च शिक्षण क्षेत्रात होणा-या नविन बदलांच्या अनुषंगाने पुढील बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग व केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या मार्गदर्शक सूचनां निर्गमित केलेल्या आहेत. जसे की, Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP), Internship, IKS, SWAYAM, Vidyalaxmi Loan Scheme, SATHEE इत्यादी.

(२) Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP), Internship, IKS, SWAYAM, Mahaswayam यासंदर्भातील आवश्यक त्यासूचना शासनाकडून सर्व अकृषि विद्यापीठांना देण्यात आलेल्या आहेत व त्यानुसार अंमलबजावणी विद्यापीठ स्तरावरुन सुरु आहे.

(३) PM- Vidyalaxmi Loan Scheme- केंद्र शासनाच्या या योजनेनुसार केंद्र शासनाने निवडक अशा उच्च शिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेऊ इच्छिणा-या विद्यार्थ्यांसाठी विद्याविषयक कर्ज उपलब्ध करुन देण्याचे प्रायोजित करण्यात आले आहे. यामध्ये महाराष्ट्र राज्यातील निवडक उच्च शिक्षण संस्थांचाही समावेश आहे.

(४) PM- Vidyalaxmi Loan Scheme योजनेप्रमाणेच केंद्र शासनाने PM- Uchchatar Shiksha Protsahan (PM-USP) ही योजनासुद्धा सुरु केलेली आहे.

(५) उच्च शिक्षण विभाग, शिक्षण मंत्रालय आणि आयआयटी कानपूर यांच्या सहयोगाने JEE, NEET आणि विविध राज्यस्तरीय अभियांत्रिकी तसेच इतर स्पर्धा परीक्षांमध्ये सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला, विशेषतः जे महागड्या कोचिंग क्लासेस परवडत नसल्यामुळे मागे आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी गुणवत्तापूर्ण, समान दर्जाचे शिक्षण प्रदान करण्याच्या उद्देशाने SATHEE (सेल्फ-असेसमेंट, टेस्ट अँड हेल्प फॉर एंट्रन्स एक्झामिनेशन) पोर्टल सुरू करण्यात आले आहे.

३. उपरोक्त बदलांचा संपूर्ण परिणाम इयत्ता ९ वी, १० वी आणि १२ वी मध्ये शिक्षण घेत असलेल्या माध्यमिक आणि उच्च माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयातून उच्च शिक्षणात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना होणार आहे, विद्यार्थी केंद्रीत शिक्षणाची मुलभूत तत्वे परिणामकारकरित्या प्रत्यक्षात आणावयाच्या अनुषंगाने संदर्भाधीन दि.०५.०१.२०२४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात आलेल्या स्कुल कनेक्ट या संपर्क अभियानाची व्याप्ती वाढवून त्यामध्ये माध्यमिक आणि उच्च माध्यमिक/ कनिष्ठ महाविद्यालयांचा समावेश करणे आवश्यक ठरले आहे. त्यानुसार, सदर संपर्क अभियान **स्कुल कनेक्ट २.०** म्हणून सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात यावे.

४. या स्कुल कनेक्ट अभियान २.० या संपर्क अभियानाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

(१) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील विद्यार्थीकेंद्री बदलांविषयी आणि त्यांच्या हितकारक परिणामाविषयी विद्यार्थी आणि पालकांना मार्गदर्शन करणे.

(२) विद्यापीठांनी तयार केलेल्या अनुभवाधिष्ठित, बहुविद्याशाखीय लवचिक अभ्यासक्रमाविषयी सविस्तर माहिती उपलब्ध करून देणे.

(३) मूल्यमापनातील श्रेयांक पद्धती आणि त्यामुळे आलेली लवचिकता समजावून सांगणे.

(४) मुक्त दूरस्थ शिक्षणाच्या संधी, कल्पक, व्यावसायिक आणि कौशल्यावर आधारित संबोधनांविषयी विशेषतत्वाने माहिती देणे.

(५) विद्यार्थ्यासाठी उपलब्ध असणाऱ्या शिष्यवृत्तीविषयी सविस्तर माहिती देणे.

(६) विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध असलेल्या संधी विषयी माहिती देणे.

(७) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० मधील विद्यार्थीकेंद्री बदल जसे की, Apprenticeship Embedded Degree Programme (AEDP), Internship, IKS, SWAYAM, Mahaswayam, Vidyalaxmi Loan Scheme, SATHEE इ. नाविण्यपूर्ण बदलाविषयी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करणे.

(८) विद्यार्थ्यांना बारावी नंतर त्यांच्या आवडीचे अभ्यासक्रम निवडण्यासाठी त्यांना मार्गदर्शन करणे.

(९) दहावी नंतर ज्या विद्यार्थ्यांना एखाद्या रोजगाराशी संलग्नित अभ्यासक्रम निवडायचा असेल त्यांना त्यासाठी उपलब्ध संधी आणि पुढे पदवी अभ्यासक्रमात उपलब्ध संधीची माहिती करुन देणे.

(१०) शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालयाचा प्रत्येक विद्यार्थी उच्च शिक्षणाकडे आकृष्ट होईल यासाठी मार्गदर्शन करणे.

**स्कूल कनेक्ट २.०** संपर्क अभियानाचे सर्व विद्यापीठांचे प्र-कुलगुरु यांनी काटेकोर नियोजन पुढीलप्रमाणे करावेः-

(अ) कार्यक्रमाची पूर्वतयारी-

(१) हा उपक्रम विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून राबविण्यात यावा.

(२) सदर उपक्रम दि.१ जानेवारी, २०२५ ते दि.१५ जानेवारी, २०२५ या कालावधीत राबविण्यात यावा.

(३) त्यासाठी खालील प्रमाणे विद्यापीठस्तरावर समन्वय समितीची स्थापना करण्यात यावी .

i. प्र-कुलगुरु (अध्यक्ष),

ii. सर्व अधिष्ठाता, (सदस्य)

iii. चांगल्या गुणवत्ता असलेले संलग्नित वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, (सदस्य)

iv. शाळांशी संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक, (सदस्य)

v. चांगल्या गुणवत्ता असलेले शाळांचे मुख्याध्यापक, (सदस्य)

vi. विद्यार्थी प्रतिनिधी यांचा समावेश असावा. (सदस्य)

vii. IQAC चे सदस्य, (सदस्य सचिव)

(४) विद्यापीठाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातील तरतूदींनुसार तयार केलेल्या नविन कौशल्यपुर्ण अभ्यासक्रमांची आणि इतर योजनांची, शिष्यवृत्यांची (राज्यशासनाच्या तसेच केंद्र शासनाच्या) योग्य आणि अचूक माहितीचे एक सविस्तर टिपण आणि सादरीकरण तयार करावे.

(५) या संपर्क अभियानासाठी संवादक म्हणून संवाद कुशल वक्तृत्वगुण असलेल्या विद्यापीठातील आणि संलग्नित महाविद्यालयातील प्राध्यापकांमधून साधन व्यक्तींची (Resource Person) विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील विभागवार निवड करावी.

(६) या साधन व्यक्तींचे एक दिवसाचे प्रशिक्षण शिबीर घ्यावे. या शिबीरामध्ये तयार केलेले सविस्तर टिपण आणि सादरीकरण यावर साधकबाधक चर्चा करावी. सामान्यपणे विचारल्या जाणाऱ्या प्रश्नांवरही (FAQ) चर्चा करावी.

(ब) संपर्क अभियानाच्या कार्यशाळेसाठी पूर्व नियोजन -

(१) विद्यापीठातील परिक्षेत्रातील शाळा संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयांची तसेच शाळांची यादी तयार करावी. संपर्क अभियानासाठी संलग्नित महाविद्यालयातील योग्य महाविद्यालयाची संयोजक महाविद्यालय म्हणून निवड करावी. या संयोजक महाविद्यालयांनी दोन सत्रांमध्ये कार्यशाळा घ्याव्यात. उपलब्ध सभागृहाच्या क्षमतेनुसार, कार्यशाळेसाठी आसपासच्या ३-४ कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी, बारावी तसेच इयत्ता नववी, दहावी च्या विद्यार्थ्यांना पाचारण करावे.

(२) समन्वय समितीने प्रामुख्याने शाळेतील संलग्नित कनिष्ठ महाविद्यालयांना प्राधान्य द्यावे.

(३) या कार्यशाळांमध्ये इयत्ता १२ वी च्या पुनर्परिक्षार्थींचा विशेषत्वाने समावेश करावा.

(४) समन्वय समितीने संपर्क अभियान उपक्रमांचे काटेकोर नियोजन करावे, उपक्रमाचा संयुक्त आराखडा तयार करावा.

(५) एकसूत्रतेसाठी संबंधित सर्व प्रमुख व्यक्तींकडे संयोजक महाविद्यालयाचे नाव, सत्रांची तारीख, वेळ, प्रत्येक आमंत्रित कनिष्ठ महाविद्यालये/ शाळांची माहिती, साधन व्यक्तीची माहिती, संपर्क दुवे, भ्रमणध्वनी क्रमांक इत्यादीचे लेखी टिपण असावे.

(६) संयोजन महाविद्यालयाकडे बॅनर/ स्टँडीचा मजकूर रचना, संयोजन महाविद्यालयाला आणि साधन व्यक्तीला देण्यासाठी प्रमाणपत्र, आदरातिथ्यांचे नियोजन याविषयी संपूर्ण माहिती असावी. संयोजक महाविद्यालयाने कार्यक्रमपत्रिका तयार करावी.

(७) कार्यशाळेच्या आयोजनासाठी संयोजक महाविद्यालयांना लागणारा प्रत्यक्ष खर्च आणि साधन व्यक्तींचे मानधन, प्रवास खर्च, आदरातिथ्य इत्यादींसाठी लागणारे अपेक्षित अर्थसहाय्य विद्यापीठाच्या योग्य प्राधिकरणांमार्फत मंजूर करुन घ्यावे. त्याविषयीची स्पष्टता संयोजक महाविद्यालयांना द्यावी.

(क) संपर्क अभियान कार्यशाळेदरम्यानची कार्यवाही -

(१) संयोजक महाविद्यालयांनी कार्यक्रमांचे सूत्रसंचालन करावे.

(२) अभियानाची सुरुवात विद्यापीठ गीताने व्हावी आणि शेवट राष्ट्रगीताने करावा.

(३) साधन व्यक्तीने उद् बोधन करावे, सादरीकरण करावे. सादरीकरणा दरम्यान विचारलेल्या शंकांचे निरसन करावे.

(४) विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची यादी करावी. ज्याचा उपयोग पुढील कार्यशाळेकरीता करता येईल.

(५) कार्यशाळेसाठी उपस्थित असलेल्या विद्यार्थ्यांचे पत्ते, ई-मेल, भ्रमणध्वनी क्रमांक जमा करावे. संयोजक महाविद्यालयांनी त्यासाठी गुगल फॉर्म तयार करावा. गुगल फॉर्म भरण्यासाठी विद्यार्थी स्वयंसेवकांनी मदत करावी.

(६) उपस्थित विद्यार्थ्यांना दुसरा टप्पा म्हणजेच "कॅम्पस टूर" विषयी माहिती द्यावी. त्याचा अग्रक्रम नोंदवून घ्यावा.

(७) संपर्क अभियानाच्या यशस्वी आयोजनानंतर संयोजक महाविद्यालयांनी अहवाल तयार करावा. तो विद्यापीठाला सादर करावा.

(८) गुगल फॉर्म वरुन इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा Data base तयार करावा.

(९) कार्यशाळा संपन्न झाल्यानंतर विद्यापीठांनी संयोजक महाविद्यालयांकडून प्राप्त अहवालांचे परिशिलन करुन एकत्रित समर्पक अहवाल तयार करावा व या विभागास फेब्रुवारी महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सादर करावा.

(ड) दुस-या टप्प्यात कॅम्पस टूर चे आयोजन-

(१) संपर्क अभियाना दरम्यान गुगल फॉर्म व्दारे संकलन केलेल्या माहितीच्या आधारे प्राधान्य क्रमानुसार विद्यार्थ्यांची यादी महाविद्यालयांकडे पाठवावी.

(२) विद्यापीठाने आणि महाविद्यालयाने कॅम्पस टूरचे नियोजन करावे. विद्यार्थ्यांना पाचारण करावे.

(३) विद्यार्थ्यांना संस्थेची माहिती, पायाभूत सुविधांविषयी माहिती, अभ्यासक्रमांची आणि त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपलब्ध उपक्रमांविषयी माहिती द्यावी. विविध शिष्यवृत्तींसाठी माहिती द्यावी.

५. या सर्व अभियानाचे समन्वय संबंधित विभागातील सहसंचालक, उच्च शिक्षण हे करतील. याकरीता प्रादेशिक सहसंचालक, तंत्रशिक्षण तसेच कला संचालनालयाअंतर्गत संबंधित अधिकारी यांनी

आवश्यक सहकार्य करावे. या अभियानांतर्गत विद्यापीठांनी राबविलेल्या उपक्रमांचा अहवाल सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण यांचेमार्फत शासनास दिनांक १५ फेब्रुवारी, २०२५ पर्यंत सादर करावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४१२२०१७५९२४०६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2024.12.20 18:00:53 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति:-**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई,
२. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
३. कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे,
४. कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे,
५. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
६. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
७. संचालक, कला, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
८. सहसंचालक, उच्च शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये,
९. सहसंचालक, तंत्र शिक्षण, सर्व विभागीय कार्यालये,
१०. सर्व सह/उप सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई,
११. निवड नस्ती (विशि-३) , उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

College Code:-　　　　　　　　College Name:

# University of Mumbai

# National Education Policy 2020

# School Connect 2.0

# 1st Jan 2025 – 15th Jan 2025

College Code :

College Name

Address

Junior College / School Name

Address

Number of attendees:

Resource Person:

Name of Principal/ School Head Master with Mobile number

College Code:- College Name:

# One page Report

College Code:-

College Name:

Insert Geo-tagged Photograph

Insert Geo-tagged Photograph

Insert Geo-tagged Photograph

Insert Geo-tagged Photograph

Insert Geo-tagged Photograph

Insert Geo-tagged Photograph

College Code:- College Name:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| College Code | | | | | |
| Name of College | | | | | |
| Name of Junior College/ School | | | | | |
| Address | | | | | |
| Sno | Name of Student | Class | Mobile Number | Email Address | Signature |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

College Code:- College Name:

# Questions asked